सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/नागपूर/अधिछात्रवृत्ती/phd/२०२१-२२/ **दि.१८.१०.२०२१**

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत पीएच.डी.अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत तात्पुरती निवड झालेल्या उमेदवारांची यादी

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत पीएच.डी.अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांची दि.३०, ३१ ऑगस्ट तसेच ०१, ०७ व ०८ सप्टेंबर २०२१ रोजी सर्व आवश्यक कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केल्यानुसार पुढीलप्रमाणे पात्र व अपात्र तसेच उमेदवारांच्या निवड यादीस दि.१६ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार पीएच.डी.अधिछात्रवृत्ती-२०२१ योजनेअंतर्गत तात्पुरती निवड यादी सोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे. महाज्योती, नागपूर ने प्रसिध्द केलेल्या जाहिरात व योजनेच्या स्वरूपात नमूद सामाजिक प्रवर्ग-क्षेत्रनिहाय आरक्षणाच्या जागा वाटपानुसार निवड करण्यात आलेली आहे.

प्रसिद्ध यादी बाबत काही आक्षेप असल्यास दि.२८ ऑक्टोबर २०२१, दु.५.०० वाजेपर्यंत fellowshipmahajyoti@gmail.com या मेलवर पाठवावे, या व्यतिरिक्त अन्य ई-मेल आयडीवरील आक्षेप विचारात घेतले जाणार नाही. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप व माहिती स्वीकारली जाणार नाही. सदर निवड ही उमेदवाराने कोणताही रोजगार/स्वयंरोजगार करीत नसल्याबाबत व कोणतीही इतर अधिछात्रवृत्ती मिळत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्याच्या आधारावर केलेली आहे, पुढील काळात निवड झालेला कोणताही उमेदवार हा रोजगार/स्वयंरोजगार करीत असल्याबाबत किंवा कोणतीही इतर अधिछात्रवृत्ती मिळत असल्याबाबत माहिती या कार्यालयास प्राप्त झाल्यास त्या उमेदवाराकडून अधिछात्रवृत्तीची रक्कम वसूल करून त्याविरोधात फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

ज्या उमेदवारांची तात्पुरती निवड झालेली आहे, त्या उमेदवारांना महाज्योती, नागपूर मार्फत पुढील काळात मेलद्वारे पाठविण्यात येणारे प्रपत्र मुदतीत भरून द्यावे.

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर.